दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २८९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१३ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# दुकानांच्या पाट्या मराठीतच ; ठाकरे सरकारचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एकीकडे मुंबईसह राज्यभरात मराठी वाचवा मोहिम सुरु असताना अनेक ठिकाणच्या दुकानावरील पाट्या मात्र मराठीत नसायच्या. राज्यातील सर्व दुकानांवरती मराठीत पाट्या असाव्यात असा नियम राज्य सरकारने केला होता. पण त्याची अंमलबजावणी व्हायची नाही, तसेच दुकानदार यातून अनेक पळवाटा शोधायचे. आता सर्व दुकानांवरील पाट्या मराठीत कराव्या लागणार आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

सर्व दुकानांवरती मराठीत पाट्या असाव्यात असा नियम राज्य सरकारने केला होता. त्यानंतर याची अंमलबजावणी होत नव्हती. अनेक ठिकाणी इंग्रजी मध्ये मोठ्या अक्षरात नाव असायचं. मराठीत मात्र लहान अक्षरात नावं असायची. आजच्या निर्णयाने इतर भाषेच्या प्रमाणे मराठीतील नावही तेवढच मोठं ठेवावं लागणार आहे. मराठीत-देवनागरी लिपितील अक्षरे दुसऱ्या (इंग्रजी किंवा अन्य) लिपीतील अक्षरांपेक्षा लहान ठेवता येणार नाहीत, अशी दुरुस्ती मंजूर करण्यात आली.



दुकानांच्या पाट्या मराठीत असण्याबाबत 'महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम २०१७' हा अधिनियम लागू होत असल्याने दहापेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापना व दुकाने नियमातून पळवाट काढत असल्याचे आढळून आले. अशा प्रकारच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या व त्यावर उपाययोजना करण्याचीही मागणीही होत होती. आज मंत्रीमंडळाने महाराष्ट्र दुकाने व आस्थापना ( नोकरीचे व सेव-ाशर्थीचे विनयमन) अधिनियम, २०१७ यात सुधारणा करण्याचा व पळवाट बंद करण्याचा निर्णय घेतला.

त्यामुळे मोठ्या प्रमाणेच छोट्या दुकांनावरील पाट्याही आता मराठीत कराव्या लागतील. बहुसंख्य दुकाने व व्यापारी पेढ्यांमध्ये दहापेक्षा कमी कामगार असतात, हे लक्षात घेता यापुढे रस्त्यांलगतच्या सर्वच दुकांनावरील पाट्या मराठीत लागलेल्या दिसतील.

## शासकीय यंत्रणांनी जिल्हा वार्षिक नियोजनचा निधी विहीत कालावधीत खर्च करावा : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यासाठी शासनाकडून सन २०२१-२२ करिता प्राप्त झालेला विकासनिधी संबंधित यंत्रणांनी विहीत कालावधीत खर्च करावा, असे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी सर्व शासकीय यंत्रणांना सूचित केले आहे.

जिल्हा नियोजन समितीची बैठक आज दि.१२ जानेवारी २०२२ रोजी दूरदृश्यप्रणालीद्वारे पार पडली. या बैठकीस पालकमंत्री कु.आदिती तटकरे अध्यक्षस्थानी होत्या. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती योगिता पारधी, खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनिल तटकरे, सर्वश्री आमदार बाळाराम पाटील, अनिकेत तटकरे, निरंजन डावखरे, भरत गोगावले, प्रशांत ठाकूर, महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, महेश बालदी, रविंद्र पाटील, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य ॲड. आस्वाद पाटील, सुधाकर घारे, चंद्रकांत कळंबे, गीता जाधव, प्रकाश बिनेदार, ज्ञानेश्वर पाटील, श्रीमती दर्शना भोईर, ॲड.प्रविण ठाकूर, राजश्री मिसाळ, मंगेश दांडेकर, मोहम्मद मेमन, नविनचंद्र घटवाल, संतोष निगडे, प्रसाद पाटील, हेमराज पाटील, काशिनाथ पाटील, पद्मा पाटील, नम्रता कासार, अनिल नवगणे, महाड नगराध्यक्षा स्नेहल जगताप, जितेंद्र सोनावणे, किशोर काटवार, अपेक्षा कारेकर, प्रज्योती म्हात्रे, विकास घरत, लिना घरत, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, सामाजिक न्याय व विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी परिचय देसाई व विविध शासकीय यंत्रणांचे कार्यालयप्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी अतिवृष्टीमुळे झालेले छोट्या पूलांचे-साकवांचे झालेले नुकसान, महावितरण विद्युत पुरवठा बाबत कायमस्वरुपी उपाययोजना, दरडप्रवण गावांचे सर्वेक्षण, पिक विमा योजना, अतिसंवेदनशील गावांचे पुनर्वसन, कोविड प्रतिबंधात्मक करण्यात आलेल्या खर्चांची अंमलबजावणी आदी विविध विषयांवरील जिल्हा प्रशासनासने केलेल्या कार्यवाहीबाबत समिती सदस्यांनी यावेळी मते मांडली. समिती सदस्यांनी मांडलेल्या विविध विषयांवर जिल्हा प्रशासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना

.../२

## पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांच्या मालमत्ता करात कायमस्वरूपी १०० टक्के सुट द्या

### आ.बाळाराम पाटील आणि प्रितम जनार्दन म्हात्रे यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांच्या मालमत्ता करात कायमस्वरूपी १०० टक्के सुट आणि सिडको नोड व २९ ग्रामीण गा-वाना ४० टक्के सुट देण्याची आमदार बाळाराम पाटील आणि विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे.



महाराष्ट्र राज्य शासनाच्या नगरविकास मंत्रालयातील खात्याने मुंबई, नवी मुंबई, ठाणे शहरांच्या ५०० चौरस फूटा पर्यतच्या घरांचा मालमत्ता कर कायम स्वरूपी १०० टक्के माफ केला आहे. त्याचप्रमाणे या शहराच्या पालिका प्रशासनाने टप्याटप्याने कर वाढ करून आकारणी केली होती. त्याच धरतीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रात तळोजा एमआयडीसी आणि सिडकोचे अनेक मोठे प्रकल्प सुरू आहेत. त्यामुळे मुंबई, नवी मुंबई, ठाणे शहाराच्या पालिकेप्रमाने आपल्या पनवेल पालिका क्षेत्रातील ५०० चौरस फूटाच्या घराचा मालमत्ता कर कायम स्वरूपी १०० टक्के सूट देण्याचा देखील निर्णय घेण्यात यावा. त्याचप्रमाणे पनवेलच्या महाविकास आघाडीने ७० टक्के मालमत्ता करात सुट देण्याची मागणी केली होती, त्याप्रमाणे ३० टक्के सूट देण्यात आली असून उर्वरीत ४० टक्के देखील सुट देण्यात यावी. कोवीडच्या महामारीत आपण हा निर्णय घेतल्यास नागरीकांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल अशी मागणी आमदार बाळाराम पाटील आणि विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, रायगड पालकमंत्री आदीती तटकरे, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या नगरविकास मंत्रालयातील खात्याने मुंबई, नवी मुंबई, ठाणे शहरांच्या ५०० चौरस फूटा पर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर कायम स्वरूपी १०० टक्के माफ केला आहे. या कारणास्तव पनवेल महापालिका क्षेत्रातील मालमत्ता कर धारकाना करात माफी देण्यासाठी प्रस्ताव सादर करून निर्णय घेण्यासाठी तातडीने येत्या तीन दिवमात विशेष सभेचे आयोजन करण्यात यावे अशी महत्वपूर्ण मागणी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेता प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

## रायगड किल्ला व परिसर विकासाच्या कामासाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून देणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाची कामे गतीने व्हावीत, कामांची गुणवत्ता, दर्जा कायम राखावा या विकासकामांना गती मिळण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग, पर्यटन विभाग, पुरातत्व विभाग, जिल्हा प्रशासन यांनी समन्वय राखून प्राधिकरणाला कामकाजात सहकार्य करावे, या प्राधिकरणाला मंजूर असलेला यंदाच्या आर्थिक वर्षातील नियतव्यय शंभर टक्के वितरीत करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच या प्राधिकरणाला प्राधान्याने निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.



मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाचा आढावा घेतला. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, पर्यटन राज्यमंत्री कु.आदिती तटकरे, खासदार संभाजी राजे, खासदार सुनिल तटकरे, सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर, कोकणचे विभागीय आयुक्त विलास पाटील, रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर आदि वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या प्रेरणेतून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी घडविलेला इतिहास हा प्रेरणादायी आहे. या इतिहासात रायगड आणि परिसराला मोठे महत्व आहे. त्यामुळे रायगड किल्लयाचा आणि परिसराचा विकास करण्यासाठी रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाला निधी कमी पडू देणार नाही. या प्राधिकरणाच्या कामकाजात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी रायगड जिल्हा नियोजन समितीला निधी उपलब्ध करून देण्यात येईल. या निधीचा विनियोग पालकमंत्री, जिल्हा प्रशासन आणि प्राधिकरणाने समन्वयाने करावा. राजमाता जिजाऊ माँसाहेबांचा वाडा, समाधीचे संवर्धन, जतन करण्याचे काम, शिवसृष्टी उभारणी अशी नियोजित सर्व कामे शास्त्रोक्त पद्धतीने करावीत. ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या वास्तूंचे जतन आणि संवर्धन करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

रायगड किल्ला आणि परिसर विकासाचे काम पूर्णत्वाला नेणार असून रायगड किल्ला परिसरातील २१ गावांचा विकास व्हावा, स्थानिकांना पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

## संक्षिप्त...

### राज्यभरात रुग्णांच्या संख्येत पुन्हा मोठी वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई: गेल्या दोन दिवसांपासून करोना रुग्णांची संख्या घटली होती. मात्र, आज, बुधवारी करोनाचा पुन्हा उद्रेक झाल्याचे पाहायला मिळाले. गेल्या २४ तासांत राज्यात करोना रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली. आज, राज्यात करोनाच्या ४६,७२३ नवीन रुग्णांची नोंद झाली. तर ३२ करोना रुग्णांचा मृत्यू झाला.

मागील दोन दिवसांची आकडेवारी बघितली तर, करोनाचा प्रादूर्भाव कमी झाल्याचे दिसत होते. मात्र, आज, बुधवारी करोनानं पुन्हा डोके वर काढल्याचे चित्र दिसते. आज, बुधवारी राज्यात ४६, ७२३ नवीन रुग्ण आढळले. तर ३२ करोना रुग्णांचा मृत्यू झाला. याच कालावधीत २८,०४१ करोना रुग्ण बरे होऊन त्यांना घरी सोडण्यात आले आहे. एकट्या मुंबईत १६ हजार ४२०, तर पुणे मनपा हद्दीत ४ हजार ९०३ नवे करोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. दिवसभरात ३२ करोनाबाधितांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

## तळा तालुक्यात माकडांचा हैदोस स्थानिक नागरिक त्रस्त ; वनखात्याचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यात सद्य स्थीतीत सर्व सामान्य नागरीकांना माकडांचा मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने नागरिकांत भितीयुक्त वातावरण पसरले आहे.

इंदापुर पासुन साधारण १८ कि.मी. असलेले तळा हे तसे पुर्वी दुर्गम मानले जात होते.कालांतराने तळयाला तालुक्याचा दर्जा प्राप्त झाल्याने येथे विकास काही वर्षातच झपाट्याने झाला तळ्यात इंजिनिअरिंग कॉलेजची मुर्हतमेढ तळा येथील मुंबई स्थीत प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक एन.जी.वेदक यांनी रोवल्याने तळा तालुक्याला एक प्रकारची संजीवनीच प्राप्त झाली. वेदक यांचे गावच तळा असल्याने त्यांनी तळयातच भव्यदिव्य अशी इंजीनियरिंग कॉलेजची वास्तु नावारूपाला आणली. त्यातच आता श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथे दिघी पोर्ट बंदर विकसीत झाल्याने इंदापुर जवळील रेल्वे स्थानक हे दिघी बंदराला सोईचे असल्याने इंदापुर पासुन दिघी पोर्ट हा चार पदरी रस्त्याचे काम अंतीम टप्यात असल्याने तळयाला गतवैभव महत्व प्राप्त झाले आहे. येथील जमीनीचे भाव देखील वधारल्याचे येथील स्थानीकांत बोलले जात आहे. तळा तालुक्यात अनेक व्यावसायिक मोठे व्यापारी, प्रकल्प नावारुपाला येत असताना मात्र तळा तालुक्याची मुख्य बाजारपेठ ते सोनार आळी या परीसरात माकडांचा दिवस रात्र हैदोस सुरू असल्याने लहान मुले, जेष्ठ, नागरीक छोटे मोठे व्यावसायिक पर्यटक यांच्यात भितीयुक्त वातावरण पसरले आहे.

अनेक वेळा ह्या माकडांचा मोर्चा राहत्या घरांकडेही वळवितात घरातील शिजवलेले अन्न लहान मुलांच्या हातातुन खाऊ हिसकावण्या पर्यंत यांची मजल जात असल्याचे स्थानीक



नागरिकांत बोलले जात आहे. राहत्या घरांत ही माकड टोळी घुसली की घरतील महिला वर्ग भितीपोटी बाहेरचा रस्ता धरतात काही ठिकाणी तर खुप मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या घरगुती तसेच व्यावसायिकांचे मालाचे देखील नुकसान करीत असल्याचे बोलले जात आहे. याबाबत वनसंरक्षक तळा तालुका व रायगड वनक्षेत्रपाल या माकडांचा त्वरीत बंदोबस्त करावा अशी मागणी नागरीक करीत आहेत. याबाबत तळा तालुक्यातील वनपाल व्ही. एस.पाटील यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

### शेकाप युवा नेते रोहन म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त कोळखे ग्रामपंचायतीत विकास कामांचे भूमिपूजन

## कोळखेसाठी जास्तीत जास्त निधी आणू : सरपंच मिनल रोहन म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोळखे गावासाठी अनेक विकासकामे व निधी मंजूर करण्याचा माझा प्रयत्न असून, कोळखे गावासाठी जास्तीत जास्त निधी मंजूर करून घेण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू,' असे मत सरपंच मीनल रोहन म्हात्रे यांनी व्यक्त केले. त्या शेकापचे युवा नेते आणि ग्रामपंचायत सदस्य रोहन म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित कोळखे येथे बौद्ध विहार ते राजेंद्र पाटील घर या रस्त्याच्या कामाचे आणि नवीन पाईप लाईनच्या कामाचे भूमिपूजन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी उपसरपंच अभिजित सुरते, सदस्य रोहन म्हात्रे, दिगंबर पाटील, गणेश जाधव , माजी उपसरपंच दिनकर मुंढे, पोलीस पाटील नंदकुमार जाधव, ग्रामविकास अधिकारी जगन्नाथ चवरकर, आकाश पाटील हे उपस्थित होते.



त्या पुढे म्हणाल्या की, कोळखे ग्रामपंचायत खऱ्या अर्थाने कोकणचे प्रवेशद्वार असून या पंचायतीच्या हद्दीतून जुना मुंबई - पुणे महामार्ग आणि मुंबई - गोवा महामार्गाला सुरुवात होते. कोळखे ग्रामपंचायतीने सर्वांना सामावून घेतले आहे. इथले लोक गुण्या गोविंदाने राहत असून त्यांच्या विकासासाठी कोणतेही कमतरता राहू न देणे हे आमचे कर्तव्य आहे. आमदार बाळाराम पाटील

.../२

## महिलेची ४ लाखाची पेन्शची रक्कम लांबविली ; पोलिसांकडून शोध सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात सायबर चोरट्याने खारघर सेक्टर-५ मधील महालक्ष्मी मंदिरातील एका ७३ वर्षीय वृद्ध संन्यासी महिलेला डेबिट कार्ड सुरु करुन देण्याच्या बहाण्याने तिच्या बँक खात्यातील पेन्शनची तब्बल ४ लाख रुपयांची रक्कम परस्पर लांबविल्याची घटना उघडकीस आली आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरट्याविरोधात फसवणूकीसह आयटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील ७३ वर्षीय वृद्ध महिला खारघर सेक्टर-५ मधील महालक्ष्मी मंदिरातील संन्यासी असून ४० वर्षापुर्वी त्या अमेरिकेतील एका कंपनीत मोठ्या पदावर कामाला होत्या. निवृत्त झाल्यानंतर त्या भारतात आल्यानंतर त्यांनी सन्यांस घेतला. या महिलेला अमेरिकेतील कंपनीकडून पेन्शन मिळत असल्याने त्यातून त्या आपला उदरनिर्वाह चालवत होत्या. या महिलेकडे असलेले एसबीआय बँकेचे

.../२

# राजमाता जिजाऊ जयंती निमित्त १२० गरजूंना ब्लँकेट वाटप



**दै.रायगड नगरी । दिघी**

राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त रायगड मी मराठी प्रतिष्ठान तर्फे 'मायेची ऊब' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात श्रीवर्धन, म्हसळा, तळा, माणगाव तालुक्यातील आदिवासी व गरजू बांधवांचे थंडीपासून रक्षण करण्यासाठी ब्लँकेट किटचे वाटप करण्यात आले.

स्वराज्य स्थापण करण्यासाठी आई म्हणून जिजाबाईंनी दिलेली प्रेरणा अद्वितीय आहे. याच विचाराने रायगड मी मराठी प्रतिष्ठान तर्फे 'मायेची ऊब' हा उपक्रम राबविण्यात आला. प्रतिष्ठान तर्फे जिल्ह्यातील चार तालुक्यात राजमाता जिजाऊ जयंती निमित्त १२० आदिवासी व गरजू बांधवांना ब्लँकेट किटचे वाटप करण्यात आले. काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात तापमान घसरल्याने थंडीचा कडाका वाढला आहे. या थंडीपासून बचाव व्हावा म्हणून श्रीवर्धन तालुक्यातील जसवली आदिवासी वाडी,म्हसळातील लेप आदिवासी वाडी, माणगाव मधील वडघर मुद्रे आदिवासी वाडी तसेच तळा तालुक्यातील भांनग कोंड पंचक्रोशीतील बांधवांना ब्लँकेट किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये ब्लँकेट, विक्स, आयडेक्स, व्यासलीन अशा वस्तू थंडीत वापरण्यासाठी देण्यात आल्या.

या कार्यक्रमप्रसंगी प्रगती आदावडे, अश्विनी वैराग, नंदिनी कातकर, अंकुश खडस, मधुकर लाड, सुजित शिंदे, दौलत शिर्के, भिवा पवार आदि। मान्यवरांनी भेट दिली. तसेच प्रतिष्ठानचे आदेश लाड, समीर टाकळे, विठ्ठोबा महाडिक, विराज महाडिक, अनेश खेडेकर, कृष्णा गायकर, अजय म्हशिलकर, श्रीधर रिकामे, चेतन पांचाळ हे पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या अध्यक्षतेखाली गव्हाण विभाग काँग्रेस कमिटीची आढावा बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सभासद नोंदणी अभियान अंतर्गत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची डिजिटल सभासद नोंदणीसाठी गव्हाण विभाग काँग्रेस कमिटीची बैठक रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या उपस्थितीत समाजमंदिर हॉल शेलघर येथे मंगळवार दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी पार पडली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा सोनियाजी गांधी व प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशानुसार देशात – राज्यात तसेच रायगड जिल्ह्यात डिजिटल सभासद नोंदणी मोठ्या प्रमाणात करून देशात काँग्रेस पक्षाचे सर्वात जास्त सभासद करण्याच्या दृष्टीने रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी गावोगावी बैठका सुरु केल्या आहेत. या आढावा बैठकीसाठी रा.जि.काँ.क. उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, प. ता. काँ. क. अध्यक्ष महादेव कटेकर, ओ. बी. सी. सेलचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष नंदराज मुंगाजी, मच्छीमार संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष मार्तंड नाखवा, अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष अखलाख शिलोत्री, उ. वि. यु. काँ. अध्यक्ष रोहित घरत, अंकुश म्हात्रे, अश्विन नाईक, कान्हा नाईक, यशवंत म्हात्रे, केसरीनाथ नाईक, सुरेश नाईक, प्रकाश ठाकूर, संजय खोत, अशोक म्हात्रे, आकाश म्हात्रे, अलंकार कोळी, साईनाथ साळुंखे, केसरीनाथ दापोलकर, श्याम घरत, काशिनाथ कोळी नंदकुमार कोळी, प्रकाश देशमुख, कृष्णा कोळी, अरुण कोळी, अनिल घरत, शंखर देशमुख, नारायण कोळी, शंभो म्हात्रे, सुनिल पाटील, चंद्रकांत घरत, किसन पाटील, अॅड.प्रशांत भोईर, किरण पाटील, शैलेश पाटील, अक्षय म्हात्रे, आदी उपस्थित होते.

# पालीत महापरिवर्तनवादी पत्रकार संघाच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

१२ जानेवारी रोजी माँसाहेब जिजाऊंचा जन्मोत्सव. संपूर्ण राज्यभरात विशेषतः जिजाऊ मासाहेबांचे जन्मस्थळ असलेल्या सिंदखेड राजा व समाधी स्थळ पाचाड रायगड येथे विविध प्रबोधनात्मक, लोकाभिमुख व वैचारिक उपक्रमांनी माँसाहेब जिजाऊंना अभिवादन केले जाते.पालीत महापरिवर्तनवादी पत्रकार संघाच्या वतीने बुधवारी दि.(१२) रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी जिजाऊंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे हेच खरे अभिवादन असल्याचे म्हटले. पाली सुधागडात देखील गावोगावी, खेडोपाड्यात विविध सामाजिक सेवाभावी संस्था , संघटना, यांच्यावतीने माँसाहेब जिजाऊंना अभिवादन करून त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करण्यात आला.

यावेळी शरद गोळे म्हणाले की माँसाहेब जिजाऊंनी या जगाला आदर्शवत ठरावेत असे छ. शिवाजी महाराज व छ. संभाजी महाराज असे जागतिक कीर्तीचे दोन शूरवीर, महापराक्रमी राजे घडविले. मॉसाहेबांनी अठरापगड जातीच्या मावळ्यांना शिवबांच्या व शंभुराजांच्या नेतृत्वाखाली एकत्रीत करुन स्वराज्याची निर्मीती केली. सर्वजातीधर्माचे व रयतेचे स्वराज्य निर्माण करून जगासमोर आदर्श राज्यकारभाराचा धडा दिला असे शरद गोळे म्हणाले. ह भ प महेश पोंगडे महाराज म्हणाले की माँसाहेब जिजाऊ या प्रेरणास्रोत आहे, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून त्या जीवन जगल्या, शिवरायांना निपुण युद्धकला व आदर्श राज्यकारभाराचे धडे दिले. शिवराय घडवायचे असतील तर प्रथम आजच्या महिलांना जिजाऊंच्या भूमिकेत जावे लागेल , लोकाभिमुख व रयतेचे स्वराज्य निर्माण व्हावे ही श्रींची नाही तर जिजाऊंसारख्या कर्तबगार मातेची इच्छा होती असे पोंगडे महाराज म्हणाले.

बशीर परबलकर आपल्या मनोगतात म्हणाले की माँसाहेब जिजाऊंनी सुसज्य प्रशासन व पारदर्शक असा रयत हितार्थ कारभार चालविणारे यशस्वी राज्यकर्ता बनण्याचे संस्कार शिवरायांवर करुन त्यांना स्वराज्य कार्यासाठी प्रवृत्त केले. शिवरायांचे स्वराज्य हे समता व बंधुत्ववादी होते. श्रमजिवी, कष्टकरी, बहुजन, कारागीर, व मावळ्यांचे राजे तारणहार ठरले.असे परबलकर म्हणाले. संस्थेचे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर लेंडी म्हणाले की माँसाहेब जिजाऊंचे जीवनचरित्य प्रेरणादायी आहे. अंधश्रध्दा, जातीयता व जुन्या चालीरीत्या, परंपरा मोडीत काढून समानता प्रस्तापीत करणारे धोरण आखले. येणारा प्रत्येक दिवस शुभ समजून समाजाच्या मनगटातील व सामर्थ्याच्या ताकतीवर स्वराज्याचे तोरण बांधले. कुठल्याही किल्लयाची निर्मिती करताना मुहुर्त पाहिले नाहीत. अमावस्येच्या अंधाराचा फायदा घेवून अनेक लढाया व किल्ले जिंकले. जिजाऊंचे जीवनकार्य आम्हाला कायम प्रेरक असे आहे असे श्री लेंडी म्हणाले. संस्थेचे सचिव जतीन मोरे म्हणाले की जिजाऊ मासाहेबांनी स्वराज्य संकल्पिका म्हणून जगात नावलौकिक मिळवले. थोर महानायीका व बहुजन महापुरुषांचे आदर्श सांगणारे उत्सव हे बहुजनांचे लोकउत्सव आहेत, ते आपण सर्वांनी एकजुटीने एकदिलाने साजरे केले पाहिजेत असे मोरे म्हणाले.

यावेळी ॲड राकेश पाटील, धम्मशील सावंत, शरद गोळे, ह भ प महेश पोंगडे महाराज, जतीन मोरे, भास्कर लेंडी,संतोष भोईर सर, विकी भालेराव, कैलास दळवी, महिपती जांभुलकर,बशीर परबलकर, गणेश कदम, नारायण पांगारे, भाईसाहेब बेलोसे, प्रवीण यादव, आदींसह पदाधिकारी , सामाजिक कार्यकर्ते, मान्यवर उपस्थित होते.

# गतिमंद मुलीला देण्यात आले कुटूंबियांच्या ताब्यात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या नातेवाईकांकडे राहण्यास आलेली एक गतिमंद मुलीस हि घरचा रस्ता चुकल्याने ती फिरत असताना याबाबतची माहिती तालुका पोलिसांच्या पथकास मिळताच त्यांनी तात्काळ सदर मुलीस ताब्यात घेऊन परिसरात शोध घेऊन तिच्या कुटूंबियांच्या स्वाधीन केल्याने त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले.

मिलन राजाराम चोरगे, वय २९ वर्ष, रा वाकडी, ता.पनवेल यांना एक अल्पवयीन मुलगी वय वर्ष अंदाजे १३ ही सकाळी सुमारे ११:३० वा.आपटा फाटा,वाकडी येथे फिरत असताना मिळून आल्याने त्यांनी तिला पनवेल तालुका पोलिस स्टेशनला आणले असता तिच्याकडे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक भरत पाटील व महिला पोलिस नाईक लाड यांनी विचारपूस केली असता तिला काही एक बोलता येत नव्हते व ती गतिमंद असल्याचे दिसून आले. याबाबत त्यांनी तात्काळ वाकडी चौकीचे पोहवा ओबासे व पोना हिंदुराव कदम यांना सदर मुलीचा व्हाट्सअप द्वारे मोबाइलवर फोटो पाठवून त्यांना सदर मिळून आलेल्या मुलीच्या नातेवाइकांचा सर्वत्र शोध घेण्यास सांगितले. सदर पोलीस अमंलदारानी तात्काळ शोधकार्य सुरु केले त्यांना वाकडी गावाजळ काही जण एका मुलीचा शोध घेत असताना आढळून आले त्यांना सदर मुलीचा मोबाईल मधील फोटो दाखविला असता त्यांनी सदर मुलगी त्यांची हरवलेली मुलगी असल्याचे सांगितले. सदर मुलीचे नातेवाईक पोलीस ठाण्यात आल्यानंतर योग्य ती खात्री करून सदर मुलीस तिच्या आईकडे सुपूर्त करण्यात आले. सदर अल्पवयीन व गतिमंद मुलीस पोलिसांनी सुखरूपपणे तिच्या आईच्या ताब्यात दिल्याने तिची आई व नातेवाइकांनी पनवेल तालुका पोलिसांचे आभार मानले.


## पनवेल महानगरपालिका
### ता.पनवेल, जिल्हा : रायगड, पनवेल-४१०२०६

ई-निविदा सूचना क्र.पमपा/सा.बां./(उद्यान)/६६२१/प्र.क्र.०१/१२/२०२२ दि.१२/०१/२०२२

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद ''तरतूद'' योजनेंतर्गत व महानगरपालिका निधीतून खालील कामे करणे कामी सदरहू कामाचा अनुभव असलेल्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहेत. (द्वितीय वेळ)

| अ. क्र. | कामांची नावे | कामांची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | अनामत रक्कम रु. | कोरी निविदा किंमत रु. GST. सहीत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | भिंगारी येथील प्राथमिक शाळा ४ वर्ग बांधणे. | ५०,१७,७३४/- | ५०,२००/- | ११८०/- | १८० दिवस |
| २ | कोयनावेळे येथील प्राथमिक शाळेजवळ समाज मंदिर बांधणे. | १५,६४,५७७/- | १७,५००/- | ५९०/- | १८० दिवस |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३/०१/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल याची संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

सही/-
(तृप्ती सांडभोर)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका



## Government of Maharashtra
## Range Forest Office Phansad (Wildlife) Sanctuary

At.New Mazgaon (Kasgaon), Post-Mazgaon, Tal-Murud-Janjira, Dist-Raigad
Email : rfophansad@gmail.com

### Tender Notice No.1/2021-22

**Range Forest Officer-Phansad (Wildlife) Sanctuary invites proposals from interested Civil Contractors to participate in the competitive bidding process of B-1 Tendering to-**

| Sr.No. | Work Description | Work Cost |
|---|---|---|
| 1 | Special Repairs to Cement Concrete Bandhara At.Wandre Phansad (Wildlife) Sancutuary Tal.Murud, Dist-Raigad | 350042/- |
| 2 | Construcation Road with paving providing pipe railling near Sarva (P.W.S) Tal-Murud, Dist-Raigad | 260347/- |

B-1 Tender submission would be offline and the deadline to submit the proposals is 19/01/2021 at 5.00 only.

Sd/-
Range Forest Officer
Phansad (Wildlife) Sanctuary


पृष्ठ क्र.१ वरुन...

## शासकीय यंत्रणांनी जिल्हा वार्षिक नियोजनचा निधी विहीत कालावधीत खर्च करावा

यावेळी दिले. जिल्हा वार्षिक नियोजनच्या निधीतून सर्वांनी मिळून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देवू या, यासाठी सर्व पदाधिकारी आणि अधिकारी यांचे योगदान निश्चितच महत्वाचे राहणार आहे, असेही पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी पालकमंत्री कु.आदिती तटकरे व समिती सदस्यांनी सूचित केलेल्या बाबींबाबत तातडीने संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून तात्काळ आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे सांगितले.

शेवटी उपस्थित सर्व खासदार, आमदार, नियोजन समिती सदस्य व सर्व अधिकारी यांनी हा निधी जिल्ह्यातील विकास कामांवर विहीत कालावधीत खर्च करावा, असे आवाहन करुन या कामांतून जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक यांचे जीवनमान उंचाविण्याच्या दृष्टीने कामे व्हावीत, अशी अपेक्षा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी यावेळी व्यक्त करून जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांचे सहकार्य मिळत असल्याबद्दल उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानले.

## कोळखेसाठी जास्तीत जास्त निधी आणू : सरपंच मिनल रोहन म्हात्रे

यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हापरिषदेतून आम्ही जास्तीत जास्त निधी पंचायतीला आणण्यासाठी नेहमी प्रयत्नरत असतो. भविष्यात कोळखे एखाद्या लहान नियोजित शहरासारखे दिसू लागेल एवढे सुंदर गाव आम्हाला करायचे आहे. विकासकामे करताना कोणताही भेदभाव केला जात नसून सर्वाना सोबत घेऊन कामे केली जात असल्याचे त्या म्हणाल्या. शेकापचे युवा नेते आणि कोळखे ग्रामपंचायत सदस्य रोहन म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून विकासकाकामांचे भूमिपूजन होत असल्याचे देखील त्या शेवटी म्हणाल्या. दरम्यान यामध्ये कोळखे गावात नवीन पाईप लाईन टाकणे ४ लाख ९० हजार रुपये आणि बौद्ध विहार ते राजेंद्र पाटील घर या रस्त्याच्या कामाचे ९ लाख ७१ हजार रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. ही दोन्ही कामे १५ टक्के ग्रामनिधीतून करण्यात येत आहेत.

## महिलेची ४ लाखाची पेन्शची रक्कम लांबविली ; पोलिसांकडून शोध सुरू

डेबिट कार्ड बंद असल्याने त्यांनी सदरचे डेबिट कार्ड पुन्हा सुरु करण्यासाठी गत २५ डिसेंबर रोजी गुगलवरुन एसबीआयच्या हेल्पलाईनचा शोध घेतला होता. मात्र गुगलवर त्यांना सायबर चोरट्यांनी फसवणुक करण्यासाठी ठेवलेला मोबाईल नंबर सापडला. सदर नंबरवर संन्यासी महिलेने संपर्क साधला असता, समोरील सायबर चोरट्याने एसबीआय बँकेचा कर्मचारी असल्याचे सांगून संन्यासी महिलेचे डेबिट कार्ड सुरु करून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी त्यांना मोबाईलवर एनी डेस्क हे ॲप सुरु करण्यास सांगितले. त्यानुसार संन्यासी महिलेने ॲप डाऊनलोड केल्यानंतर सायबर चोरट्याने डेबिट कार्ड सुरु करुन देण्याच्या बहाण्याने त्यांच्याकडून बँक खात्याची माहिती घेतली. त्यानंतर सदर सायबर चोरट्याने संन्यासी महिलेच्या बँक खात्यातून ४ लाख २ हजार ७२६ रुपये काढून घेतले. याबाबतचे मेसेज त्यांच्या मोबाईलवर आल्यानंतर आपली फसवणुक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकारामुळे घाबरलेल्या संन्यासी महिलेची तब्येत बिघडल्याने त्यांनी आठवडाभरानंतर खारघर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.


सिडको शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, द्रोणागिरी येथील खालील नमूद केलेली जमीन मूळ भूधारक **कै. आत्माराम गणपत घरत** यांच्या कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसानभरपाई उपरोक्त भूधारकांनी स्वीकारली असून, संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | निवाडा क्र. | संपादित सर्व्हे क्र. / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे. आर) | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| भेंडखळ/३३३ | १६६/८२ | २४३/२<br>२५२/३<br>२५७/१७<br>२५८/५ब<br>२६०/१२<br>२६५/१४<br>२८६/११<br>२८९/६<br>३०९/५<br>६७/४पै.<br>३१९/५ | ०-५-३<br>०-३-८<br>०-३-०<br>०-१५-३<br>०-७-६<br>०-५-३<br>०-८-०<br>०-९-६<br>०-८-८<br>०-२५-०<br>०-९-७ | द्रोणागिरी | ४७ | ३३बी | १४५० चौ.मी. |
| भेंडखळ | ७अ/ ८३-८४ | १४५/६<br>१२४/३<br>१२८/९<br>१३२/६ब | ०-२७-९<br>०-८-०<br>०-१८-०<br>०-६-१ | | | | |
| भेंडखळ | ९ | १५५/३ | ०-१३-२ | | | | |

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार द्रोणागिरी येथील **सेक्टर क्र. ४७, भूखंड क्र. ३३बी, क्षेत्र -१४५० चौ.मी**. या भूखंडाचे इरादापत्र भूधारकांस देण्यात आलेले आहे.

| कै. आत्माराम गणपत घरत (मयत) यांचे कायदेशीर वारस-(पृष्ठ क्र.१२७/प ते १४९/प) | कै. जगन्नाथ गणपत घरत (मयत) यांचे कायदेशीर वारस-(पृष्ठ क्र. १५१/प ते १६७/प) |
|---|---|
| मच्छिंद्रनाथ उर्फ मच्छिंद्रनात आत्माराम घरत<br>सदानंद आत्माराम घरत<br>गणेश आत्माराम घरत<br>प्रमिला रमाकांत ठाकूर<br>वनिता बाळाराम ठाकूर | प्राण जगन्नाथ घरत<br>प्रतिभा जगन्नाथ घरत<br>मनोज जगन्नाथ घरत<br>अनिता अमर कडवे<br>भारती अनिल पाटील |

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| **आत्माराम गणपत घरत (मयत) यांचे कायदेशीर वारस-**<br>प्रमिला रमाकांत ठाकूर<br>वनिता बाळाराम ठाकूर<br>**जगन्नाथ गणपत घरत (मयत) यांचे कायदेशीर वारस-**<br>प्रतिभा जगन्नाथ घरत<br>अनिता अमर कडवे<br>भारती अनिल पाटील | १) मच्छिंद्रनाथ उर्फ मच्छिंद्रनात आत्माराम घरत<br>२) सदानंद आत्माराम घरत<br>३) गणेश आत्माराम घरत<br>४) प्राण जगन्नाथ घरत<br>५) मनोज जगन्नाथ घरत |

उपरोक्त तक्त्यामधील (हक्कसोड) नुसार सिडकोकडून केवळ खालील नमूद केलेल्या व्यक्तिच भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|
| १) मच्छिंद्रनाथ उर्फ मच्छिंद्रनात आत्माराम घरत |
| २) सदानंद आत्माराम घरत |
| ३) गणेश आत्माराम घरत |
| ४) प्राण जगन्नाथ घरत |
| ५) मनोज जगन्नाथ घरत |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना त्यांच्या नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीच्या बदल्यात लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, सातवा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३०(तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत.

वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही, असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधित गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल, अशा ठिकाणी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३८२/२०२१-२२


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# लोकनेते दि.बा.पाटील फेलोशिपची राज ठाकरे यांच्याकडून घोषणा

## लोकनेते दि.बा.पाटील यांचा मनसेतर्फे अनोखा सन्मान

**दै.रायगड नगरी । उरण**

कष्टकरी, कामगार, प्रकल्पग्रस्त व आगरी – कोळी बांधवांचे ज्येष्ठ नेते दि.बा.पाटील यांच्या सन्मानार्थ व स्मृती प्रित्यर्थ दि.बा.पाटील फेलोशिप अर्थात पाठ्यवृत्तीची आज मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी घोषणा केली व त्याच्या पोस्टरचे अनावरण केले.या उपक्रमास मनापासून शुभेच्छा देत, या उपक्रमातून महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांवर अभ्यास होईल व हा सर्व अभ्यास महाराष्ट्रासमोर यावा अशी सूचना याप्रसंगी राज ठाकरे यांनी संयोजकांना केली.याप्रसंगी या फेलोशिपचे समन्वयक नवी मुंबई मनसे शहर अध्यक्ष गजानन काळे उपस्थित होते. तसेच या वेळी रायगड जिल्हाअध्यक्ष अतुल भगत, नवी मुंबई उपशहर अध्यक्ष सविनय म्हात्रे उपस्थित होते. फेलोशिप मुख्य समन्वयक आमदार राजू दादा पाटील तब्येतीमुळे उपस्थित राहू शकले नाही.

आदरणीय दि.बा.पाटील साहेबांच्या कार्याला सलाम करण्याहेतू ही फेलोशिप सुरू केल्याचे या प्रकल्पाचे मुख्य समन्वयक आमदार राजूदादा पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. दि.बा यांचा वारसा सर्व स्तरातील सर्व समाजातील युवकांपर्यंत विविध माध्यमातून पोहोचविणे हे आम्ही आमचे आद्य कर्तव्य समजतो असे देखील मुख्य समन्वयक राजूदादा पाटील यांनी म्हटले आहे.

मुंबई,नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, कल्याण येथील शहरी ग्रामीण भागात आगरी कोळी



समाजाच्या प्रश्र्नांबरोबर विविध प्रश्न आ वासून उभे आहेत. त्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण संशोधन व्हावे,ते प्रश्न सोडविण्याचा समाजातील सर्वच संघटनांना त्याचा लाभ व्हावा व या प्रश्नांच्या अभ्यासाचा दस्–तऐवज तयार व्हावा या उद्देशानेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना म्हणून आम्ही पुढाकार घेऊन लोकनेते दि.बा. पाटील पाठ्यवृत्ती (फेलोशिप) सुरू करीत असल्याचे आमदार राजूदादा पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

येत्या काही दिवसांत पक्षाचे नेते अनिल शिदोरे, राजू दादा व तज्ज्ञांची एक समिती पत्रकार परिषदेच्या माध्यमातून या फेलोशिपबाबत सविस्तर माहिती देणार असल्याचे या फेलोशिपचे समन्वयक नवी मुंबई मनसे शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी म्हटले आहे.तसेच फेलोशिपचे मानधन किती असेल,एकूण किती अर्जदार निवडले जातील,निवड प्रक्रिया काय असेल,अर्ज करायची मुदत काय असेल,फेलोशिपसाठी वयोमर्यादा व फेलोशिपसाठी अर्ज करण्याचे वेळापत्रक याबाबत सर्व माहिती पत्रकार परिषदेमधून देणार असल्याचे व या फेलोशिपबाबत अर्ज करण्यासाठी लवकरच एक संकेतस्थळ देखील कार्यान्वित करणार असल्याचे गजानन काळे यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

लोकनेते दि.बा.पाटील यांच्यावर असलेले प्रेम व त्यांच्या कार्याप्रती असलेला आदर व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केलेला हा प्रयत्न असल्याचे मनसेने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# शिंपडलेल्या पावसाने कोसळला महावितरणचा खांब ; कालवली पाटीलवाडी दोन दिवस वीजपुरवठ्याविनाच

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील महावितरणचे खुमासदार किस्से दररोज ठिकठिकाणाहून ऐकण्यास येत असून रविवारी पहाटे शिंपडलेल्या अवकाळी पावसामुळे चक्क विद्युतवाहक तारा असलेला एक खांब धाराशायी झाला. या घटनेकडे पोलादपूर तालुक्यातील महावितरणच्या अभियंत्यांकडून दोन दिवस सपशेल दूर्लक्ष करण्यात आल्याने कालवली पाटीलवाडीतील ग्रामस्थांना दोन दिवस वीज पुरवठ्याविनाच काढावे लागल्याचा त्रास नाहक सोसावा लागला आहे.

पोलादपूर तालुक्यात सध्या एलअँडटी या ठेकेदार कंपनीकडून चौपदरीकरणाच्या कामाच्या मध्यभागी झाडे लावण्यासाठी एक ड्रिलमशीन वापरात येत असल्याचे पाहून महावितरणच्या ठेकेदारांनीदेखील अशाप्रकारच्या मशिनचा वापर केल्याने सवाद धारवली कालवली हावरे सप्तक्रोशीमध्ये गेल्या पावसाळ्यामध्ये काही विजेचे खांब कोसळल्याच्या घटना लक्ष्यवेधी ठरल्या होत्या. मात्र, रविवारी पहाटेच्या सुमारास याच परिसरात अवकाळी पावसाचे आगमन होऊन शिंपडल्यासारखा पाऊस पडल्यानंतर कालवली स्टॉपच्या मागील बाजूच्या डीपीजवळील एक विजेचा खांब जमिनीवर कोसळला. यामुळे खांबावरील विद्युतवाहक तारांमुळे आजूबाजूचे खांबदेखील तिरके झाले.

कालवली पाटीलवाडी ग्रामस्थांनी या घटनेची माहिती स्थानिक जनमित्र तसेच अभियंता यांना सांगितली. मात्र, रविवारी दिवसा तसेच सोमवारीदेखील याप्रश्नी महावितरणच्या अभियंत्यांनी घटनेची दखल न घेतल्याने ग्राहकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. या सर्व प्रकाराने मेटाकुटीस आलेल्या ग्रामस्थांना अभियंता सुद यांच्याकडून तातडीने कार्यवाही होईल, अशी अपेक्षा असताना ठेकेदारांची बिले रखडली असल्याने ठेकेदार काम करीत नसल्याचे सांगून या घटनेकडे कानाडोळा केला गेला. यामुळे काही ग्रामस्थांनी मध्यस्थांमार्फत कार्यकारी अभियंता पाचपोहे यांच्याकडे ही समस्या मांडून तातडीने कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त केली असता त्यांनी तातडीने विद्युतपुरवठा सुरू होण्यासाठी खांब बदलण्याची ग्वाही दिली.

पोलादपूर तालुक्यातील महावितरणचे अभियंता सूद यांना नियमापेक्षा जास्त काळ पोलादपूर येथे सेवा बजवावी लागली असल्याने त्यांनी बदली होण्याच्या अपेक्षेतून तात्काळ ग्राहकसेवा देण्याचे टाळले असल्याची माहिती प्राप्त झाली असल्याचे यावेळी ग्राहकांकडून सांगण्यात आले.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकतीचे क्षेत्र त्या मिळकतीसमोर लिहिलेल्या मालक / कब्जेदारांचे कडून आमचे अशिल हे कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक / कब्जेदार यांनी आमचे अशिल कडून ठरलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी बयाणा स्वीकारून लेखी करार केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : मालडुंगे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | गट नं. | हिस्सा नं. | विक्री क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री.तात्या उर्फ अभिमन्यू भगवान पाटील व इतर २३ | ५ | अ | एकूण ४–८७–५० पैकी ४–६४–00 | ९.०९ |
| श्री.वासुदेव धर्मा पाटील व श्री.प्रदीप यज्ञेश्वर पाटील यांचे हिश्श्याचे 00–२३–00 क्षेत्र अथवा त्यांचे हिश्श्याचे क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्राकरिता | | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत. अन्यथा मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन, आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग, मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १३/०१/२०२२

**कार्यालयीन पत्ता :–**
**फ्लॅट नं.४०६, बी–विंग, ड्रिम रेसिडेंन्सी,**
**प्लॉट नं.0८, सेक्टर ४, करंजाडे,**
**ता.पनवेल, जि.रायगड.**
**मोबाईल नं.८१०८९८६५८८/९३२६४२४०६३**

**सही/–**
**ॲड.कुलदीप आर. पाटील**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**



मुजावर सो.

ॲड.एस.जी.पाटकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.२०१६/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१०/०३/२०२२

१) श्री.तुकाराम चंदर कोळी
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.४१०, उलवेगाव, ता.पनवेल
२) श्री.राम चंदर कोळी
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.४०६, उलवेगाव, ता.पनवेल — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी वरील अर्जदार ह्यांची आत्या कै.आनंदीबाई हरिभाऊ कोळी या दि.१५/०७/२०१८ रोजी मयत झाले असून त्यांचे पती श्री.हरिभाऊ बुधाजी कोळी हे देखील मयत असून त्यांना मुलबाळ नसल्याने त्यांना प्रथम श्रेणीतील कोणीही वारसदार नाहीत. अर्जदार हे त्यांचे भाचे / भावाची मुले असून कायदेशीर वारसदार आहेत.

सदर मयत कै.आनंदीबाई हरिभाऊ कोळी यांचे आजोबा कै.लाला कोळी यांच्या मौजे : उलवे येथे मिळकती होत्या. त्यांचे कै.लाला कोळी यांचे पश्चात सदर मिळकतीत त्यांचा मुलगा व मयत कै.आनंदीबाई कोळी हिचे वडील कै. नारायण लाला कोळी याचे अविभाज्य हिस्सा होता व आहे. त्यामुळे सदर श्री.नारायण लाला कोळी मयत झाल्यानंतर त्यांचे हिश्श्यात त्यांची मुलगी म्हणून मयत कै.आनंदीबाई हरिभाऊ कोळी यांचा अविभाज्य हिस्सा, हक्क व अधिकार होता व आहे. परंतु ते मयत झाल्याने सदर मिळकतीत त्यांचा असलेला हिस्सा त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्जदारांना मिळावा म्हणून सदर मिळकतीत असलेल्या हिश्श्याबाबत अर्जदारांनी वारस दाखला मिळावा यासाठी अर्ज केला आहे. सदरच्या मिळकती खालीलप्रमाणे:–

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| उलवे | १२१ ब | ६१ | ४ | १–६५–0 |
| उलवे | १२१ फ | १०४ | ३+५+८ | 0–३२–0 |

वर नमूद मिळकती नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या आहेत. सदर संपादीत जमिनीच्या मोबदल्यात सिडकोच्या १२.५ टक्के योजनेंतर्गत सिडकोकडून भूखंडाचे वाटप केले जाते. सदर कामी भूखंड मिळणार आहेत.

त्याअर्थी कै.आनंदीबाई हरिभाऊ कोळी यांचा वर नमूद मिळकतीत असलेला अविभाज्य हिस्सा व हक्कास अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनुसार अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१२/०१/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्याने दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# मुरुड नगरपरिषदेतर्फे राजमाता जिजाऊ व युग पुरुष स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड नगरपरिषद तर्फे आज नगरपरिषदेच्या हॉल मध्ये राजमाता जिजाऊ माँ साहेब तसेच युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली. शासनाच्या अध्यदेशाप्रमाणे सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये हि जयंती साजरी करण्याचे आदेश होते. त्याप्रमाणे हि जयंती नगरपरिषदे मध्ये सुद्धा साजरी करण्यात आली. यावेळी मुरुड नगरपरिषदेचे पाणी पुरवठा सभापती पांडुरंग आरेकर यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. यावेळी मुरुड नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, वरिष्ठ लिपिक नरेंद्र नांदगावकर, आरोग्य अधिकारी राकेश पाटील, दीपक शिंदे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सौ.जनता दिपक खारकर व परवेज आलम इजराईल शेख, रा.उलवा यांच्या नावे मौजे : पुष्पकनगर वहाळ, येथील भूखंड क्रमांक ५३१, सेक्टर २४, एकूण क्षेत्र ३४० चौ.मी. नोड पुष्पकनगर, वहाळ, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड हा भूखंड सिडकोने दि.२३/१२/२०२१ रोजीच्या ॲग्रीमेंट टु लीज / भाडेपट्ट्याच्या दस्ताद्वारे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. सदरहू दस्त मा.सह दुय्यम निबंधक पनवेल क्रमांक १ यांचे कार्यालयात दि.२७/१२/२०२१ रोजी अनुक्रमांक पनवेल १/१२५६५/२०२१ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. तरी आमचे अशिल श्री क्रिष्णा बिल्डर्स तर्फे भागीदार श्री.जयेश नरोत्तम गोहिल व श्री.मुकेश नांजीराम कुमार यांनी खाली वर्णन केलेली मिळकत भूखंड हा त्या मिळकतींचे विद्यमान मालक / भाडेपट्टेदार यांचेकडून सिडकोसोबतचे त्रिपक्षीय भाडेपट्टा हस्तांतरण करारनाम्याद्वारे हस्तांतरीत / खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| नोड | भूखंड क्रमांक | सेक्टर नंबर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर, वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५३१ | २४ | ३४० |

तरी सदर मिळकतीवर विद्यमान मालक यांचे शिवाय इतर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकाारचा हक्क हितसंबंध, करार मदार, लीन, लीज, गहाण, दान, विकसन करार, कुलमुखत्यारपत्र, साठेखत, विसारपावती, खरेदीखत, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा, वहिवाट वा तत्सम प्रकारचा हक्क, बोजा, कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकती असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती, संबंधीच्या कागदपत्री पुराव्यासह, आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर मुळ कागदपत्रांसह येवून आमची खात्री पटवून द्यावी, अन्यथा सदर मिळकतीवर विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल भूखंड हस्तांतरणाचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. संपूर्ण उपभोग घेण्याचा आमचे अशिलांना अधिकार त्यानंतर कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखलाही दिला जाईल. मुदतीनंतर आलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**सही/–**
**ॲड.तृप्ती सुर्यकांत राऊत**
**शॉप नं.२, शिवधाम, सेक्टर १९, प्लॉट नं.२०, उलवे, तालुका : पनवेल, जि.रायगड**
**मोबाईल नं.९९८७२५८७१२**



मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

ॲड.प्रदीप भोईर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज नं.३६/२०२२
ने.ता.१४/०२/२०२२

श्री.राहूल धाऊ भोईर
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.१, उमा को.ऑ.हौ.सोसा, प्लॉट नं.२३,
५२ बंगलो, बंदर रोड, किनारा सोसायटी जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.निबंधक
मे.पनवेल शहर महानगरपालिका
आरोग्य विभाग, पनवेल शहर,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई मयत अनुसया धाऊ भोईर या दि.२७/०७/२०१९ रोजी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तथापि अनावधानाने मयत अनुसया धाऊ भोईर यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत पनवेल शहर महानगरपालिका कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत अनुसया धाऊ भोईर यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज रोजी दि.१२/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/–** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**


# ५ कोटी रुपये किमतीची व्हेल माशाची उलटी हस्तगत

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील काशीद या ठिकाणी व्हेल माशाची उलटी विकावयास येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण अलिबाग रायगड शाखेला मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांच्या नेतृत्वाखाली एक युनिट तयार करण्यात आले यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक पवनकुमार ठाकूर,हवालदार हणमंत सूर्यवंशी,पोलीस नाईक अक्षय जाधव,पोलीस कॉन्स्टेबल ईश्वर लांबोटे यांनी काशीद या ठिकाणी पाळत ठेऊन स्प्लेंडर मोटर सायकल व डिस्कोवर मोटर सायकल वर आलेल्या आरोपीना मुद्देमालासह अटक करण्यात मोठे यश मिळवले आहे.

एका खबरीकडून स्थानीक गुन्हा अन्वेषण शाखेस व्हेल माशाची उलटी घेऊन येणाऱ्यांची माहिती मिळाली त्याप्रमाणे हा सापळा रचण्यात



आला.मोटर सायकल वर येणाऱ्या तिन्ही आरोपीना अटक करण्यात यश मिळाले आहे.सदरची व्हेल माशाची उलटी हि एक किलोस एक कोटी रुपये एवढा बाजारभाव मिळत असतो.काशीद येथे पकडलेली व्हेल माशाची उलटी हि ५ किलोची असून याची किंमत पाच कोटी रुपये एवढी आहे. त्याच प्रमाणे दोन्ही मोटर सायकल सुद्धा पकडल्याने एकंदर ५ कोटी ९० हजार मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. मुरुड तालुक्यातील मजगाव या ठिकाणी राहणारे दर्पण रमेश गुंड, राजेंद्र जनार्दन ठाकूर, व सुधागड पाली तालुक्यातील नांदगाव येथील नंदकुमार खंडू थोरवे याना अटक करण्यात आली आहे. या सर्व आरोपींवर वन्यजीव संरक्षण १९७२ चे कलम ३९, ४४, ४९ ब, ५१, व ५७ अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा मुरुड पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.


महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय**
**रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,**
**सार्वजनिक बांधकाम आवार–पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन–४०२१०७**

Email : elraigad.ee@mahapwd.gov.in / elraigad.ee@gmail.com
website : www.mahapwd.gov.in — दूरध्वनी क्र.०२१४३–२९९२८८

जा.क्र.का.अ./राविवि/निविदा/२४/सन २०२१ — दिनांक : १०.०१.२०२२

**ई–निविदा सूचना क्र.०७ सन २०२१–२२**

संदर्भ : १, महाराष्ट्र शाासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती–२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामध्ये, सा.बां.परिसर–पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड–४०२१०७ दूरध्वनी क्र.०२१४३–२९९२८८ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब–१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई–निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां.परिसर–पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड–४०२१०७ दूरध्वनी क्र.०२१४३–२९९२८८ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रु. | ई–निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग / इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | ई–निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Est No.PESD/4740/2021-22 Providing DG set of 100 KVA with AMF panel for oxygen generation plant of Covid-19 Sub District Hospital Karjat, Tal-Karjat, Dist-Raigad. | रु.१३,१२,१७६/– | दिनांक १७/०१/२०२२ सकाळी ११.00 वाजेपासून दिनांक ३१/०१/२०२२ सायंकाळी १८.00 वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ब–१ व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेर ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात. इसारा रक्कम रु.१३२००/– निविदा शुल्क रु.५००/– अधिक वस्तू व सेवा कर | दि.०२/०२/२०२२ सकाळी ११.00 |
| ०२ | Est No.PESD/4652/2021-22 Providing DG set of 100 KVA with AMF panel for oxygen generation plant of Covid-19 Sub District Hospital Pen, Tal-Pen, Dist-Raigad. | रु.११,७९,४२१/– | दिनांक १७/०१/२०२२ सकाळी ११.00 वाजेपासून दिनांक ३१/०१/२०२२ सायंकाळी १८.00 वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ब–१ व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेर ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात. इसारा रक्कम रु.११८००/– निविदा शुल्क रु.५००/– अधिक वस्तू व सेवा कर | दि.०२/०२/२०२२ सकाळी ११.00 |

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

२) कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां.परिसर–पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड–४०२१०७ दूरध्वनी क्र.०२१४३–२९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक.

३) वरील कामांकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र.१ मध्ये जोडण्यात यावे.)

४) इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे.

**सही/–**
**(स.का.पाटील)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड विद्युत विभाग,**
**सा.बां.पेण–रायगड**

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/२०१/४१/२०२२

# संक्षिप्त...

## मोबाईल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात रोखरक्कम व मोबाईल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात चोरीचे फोन हस्तगत करण्यात आले आहेत.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील महाळुंगी गाव, येथील डॉग फार्म समोरील रस्त्यावर चार अनोळखी इसमानी फिर्यादीस अडवून त्यांना मारहाण करून त्याचे खिशातील रोख रक्कम व त्याचा मोबाइल जबरीने चोरून नेल्याबाबतची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अविनाश पाळदे व अंमलदार यांनी तांत्रिक तपास तसेच बातमीदाराकडून प्राप्त माहितीनुसार मुख्य आरोपी नामे मुद्स्सीर शेख याचे सह पाहिजे असलेल्या दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करता त्यांनी गुन्ह्याची सदर कबुली दिल्याने त्यांना अटक केली.

यामध्ये आरोपी मुदस्सीर बशीर राऊत, वय २९ वर्ष, राहणार पटेल मोहल्ला, भारत नगर झोपडपट्टी, एमजी रोड, पनवेल., आर्यन विकास रोकडे, वय १८ वर्ष, राहणार रूम नंबर २, जम्नोत्री बिल्डिंग, साक्षी पार्क नंबर २, आकुरली, पो सुकापूर, पनवेल., आकाश उर्फ धोधा बेचैन चौहान, वय १९ वर्षे, राहणार शिवाजी नगर झोपडपट्टी, पनवेल एसटी स्टँडच्या मागे, पनवेल. यांना ताब्यात घेण्यात आले आहे व त्यांच्याकडून आत्तापर्यंत ३,४५,००० /–रूपये किंमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. या आरोपींनी कळंबोली पोलीस ठाणे हद्दीतील एका ठिकाणी वेश्यागमनासाठी येणाऱ्या आंबटशौकीन इसमांना रस्त्यात अडवून त्यांचे मोबाईल फोन व रोख रक्कम जबरीने काढून घेतल्याची कबूली दिली आहे.

व सदर इसम हे त्यांची बदनामी होईल या भीतीने पोलीस ठाणेत तक्रारी करत नाही अथवा कोठेही वाच्यता करीत नसल्याचा फायदा घेऊन सदर आरोपीने अनेक जणांना लुटल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. सदर आरोपींकडून प्रस्तुत गुन्ह्यातील जबरी चोरी केलेली रोख रक्कम,मोबाइल हँडसेट व गुन्हा करताना वापरलेली ऑटोरिक्षा हस्तगत केलेली आहे. याव्यतिरिक्त सदर आरोपीकडून जबरीने चोरी केलेले विविध कंपन्यांचे एकूण २१ मोबाइल हँडसेट हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळालेले आहे.

# रोहा तालुक्यातील पश्चिम खोऱ्यातील २६ गावे होणार पाणीदार

## कुंडलिका नदीच्या दोन्ही बाजूकडील २६ गावांसाठी १०० कोटींची नळपाणी योजना मंजूर

**दै.रायगड नगरी । रोहा**



जलजिवन मिशन अंतर्गत कुंडलिका नदीच्या पश्चिम खोऱ्यातील दोन्ही बाजूकडील २६ गावांसाठी १०० कोटींची नळपाणी योजना मंजूर करण्यात आली आहे. यासाठी आम. महेंद्र दळवी यांनी केलेल्या प्रयत्नांना व पाठपुराव्याला यश आले. पाणीपुरवठा मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी या योजनेच्या मंजुरीचे पत्र नुकतेच त्यांना सुपूर्द केले असून या योजनेमुळे पश्चिम खोऱ्यातील दोन्ही तीरांवरील गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीवरील उजवा तीर पडम ते धोंडखार व डावा तीर खारगाव ते कोकबन पर्यंत असलेल्या गावांची पाण्यासाठी अनेक वर्षे तडफड सुरू आहे. २६ गावातील प्रमुख कार्यकर्ते सतत जुनी पाणी योजनेद्वारे सुरळीत पाणी पुरवठा व्हावा म्हणून प्रयत्न करीत होते. शेणवई गावचे स्व.हेमंत देशमुख यांनी तर ही योजना कार्यान्वित होण्यासाठी जिल्हाधिकारी, रोहा उपविभागीय कार्यालय, तहसीलदार तसेच एम. जी. पी. एस. यांच्याकडे पाठपुरावा केला होता. ऍड. मनोजकुमार शिंदे यांच्या शिष्टमंडळाने यासाठी सतत आ. महेंद्र दळवी यांच्याकडे पाठपुरावा करीत राहिले.

शंभर कोटी रुपायांची यापाणी योजनेसाठी सन २०२१–२२ च्या जलजीवन मिशन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण आराखड्यामध्ये रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीवरील डावा तिर व उजवा तिर २६ गावांना नळ पाणी पुरवठा योजना विशेष बाब मध्ये मंजूर करण्यात आली. त्यामुळे आता ही गावे पाणीदार होणार असल्याने नागरीकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आ. ११ जानेवारी रोजी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्याकडे ग्रामस्थ, आ. महेंद्र दळवी आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्यासमवेत मंत्रालयात बैठक घेऊन अखेर शंभर कोटींची पाणीपुरवठा योजना मंजूर करून घेतली. यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील, ऑनलाईन बैठकीत पर्यावरण मंत्री ना.आदित्य ठाकरे, उपराज्यमंत्री संदीपान भुमरे, आ. महेंद्र दळवी, ऍड. मनोजकुमार शिंदे, चणेरा विभाग प्रमुख उद्देश वाडकर, माजी सरपंच सुधाकर शिंदे, विकास पाटील, रामा शेरेकर, अविनाश पाटील व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

रोहा तालुक्यातील ११ ग्रामपंचायतीमधील ३० गावांमधील नागरीकांना या योजनेचा फायदा होणार आहे. एप्रिल, मे, जून पर्यंत या गावांमध्ये पाण्याची भीषण टंचाई असते. त्यामुळे या गावांमध्ये पाणी पुरवठा करणे अत्यंत गरजेचे होते. याआगोदर २६ गाव पाणी पुरवठा योजना अस्तित्वात होती मात्र या योजनेत सुरुवातीला नागरीकांना सुरळीत पाणीपुरवठा झाला नंतर मात्र जवळच्या गावागावातील नागरीकांनी जागोजागी वैयक्तिक नळ जोडणी केल्याने लांबच्या गावांमध्ये पाणी पुरवठा कमी दाबाने होत गेला. मात्र आता असे न करता २६ गावात पाण्याच्या टाक्या, पाईपलाईन, नळ असे सेप्रेट योजनेचे स्वरूप आहे त्यामुळे आता पाणीपुरवठा अखंडितपणे सुरू राहणार आहे. ऍड.मनोजकुमार शिंदे व त्यांच्या शिष्टमंडळाने पुढाकार घेतल्याने मार्च अखेर पर्यंत या योजनेचे भूमिपूजन करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# चुकीच्या आणि अंदाधुंद पणे जाहीर केलेल्या कोविड रिपोर्टमुळे नागरिकांमध्ये घबराट : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्या पनवेल शहरात कोरोना पॉझिटिव्ह चे रुग्ण वाढत आहेत ही चिंताजनक बाब आहे, यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. या विषयात विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे बोलताना म्हणाले की, माझ्या माहितीप्रमाणे गेल्या महिन्यात केलेल्या रुग्णांच्या टेस्ट आणि या महिन्यात केलेल्या रुग्णांच्या टेस्ट यामध्ये संख्येत वाढ आहे. त्यामुळे जास्त टेस्ट केल्यामुळे रुग्ण साहजिकच जास्त येणार. तसेच एका सोसायटीमध्ये एक व्यक्ती पॉझिटिव आली म्हणून सरसकट सगळ्या घरांमध्ये टेस्ट सध्या केली जात आहे अशा वेळी घरातील सुदृढ व्यक्तीला सुद्धा पॉझिटिव्ह ठरवण्यात येते आणि त्यामुळे घरातील तसेच त्या इमारतीतील सर्व वातावरण घबराटीचे होते. सदर रिपोर्ट करत असताना बिल्डींगमधील व्यक्तीचे नाव, त्याच्या राहत असणाऱ्या मजल्याचा क्रमांक, तसेच त्याचा राहत असलेला इमारतीमधील रूमचा क्रमांक यामध्ये तफावत आढळून आलेली आहे. आणि हा गोंधळ वाला रिपोर्ट जेव्हा नागरिकांना समजतो त्यावेळी नागरिकांमध्ये पनवेल महानगरपालिके मार्फत फक्त टेस्ट वाढविण्यासाठीच हे सर्व केले जात आहे याची शंका निर्माण होत आहे.




सदरची गोष्ट विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या निदर्शनास आली आणि ही बाब ही खूप चिंताजनक आहे . त्यांनी या गोष्टीत जातीने लक्ष घालून नागरिकांना नाहक त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशी आयुक्तांकडे मागणी केली आहे. तसेच टेस्ट करत असलेल्या संस्थेला सुद्धा यासंदर्भातील कारणे दाखवा नोटीस जाहिर करावी आपल्या माहितीसाठी एक रिपोर्ट पाठवत आहे त्या सोसायटीमधील गृहस्थांना आपण आपली दुसरी टीम पाठवून मी घेतलेल्या शंकेचे निरसन पनवेल महानगरपालिकेने करून घ्यावे आपल्याला पाहिजे असल्यास माझा प्रतिनिधी सुद्धा आपल्या सोबत तेथे जाईल.

तसेच आयुक्तांना दिलेल्या पत्रात विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी सांगितले की, पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेवर विश्वास आहे परंतु अशा काही गोष्टी निदर्शनास आल्यामुळे त्या आपल्यापर्यंत पोहोचाव्यात आणि सदर गोष्टी पुन्हा घडणार नाहीत याची काळजी घ्यावी हे आपले कर्तव्य मी समजतो आपण या गोष्टीचा नक्कीच विचार करावा. सध्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अशा प्रकारच्या गोष्टी घडत आहेत पण या विरुद्ध कोणी बोलण्यास पुढे येत नव्हते हा विषय विरोधी पक्ष नेत्यांनी हातात घेतल्यामुळे सोशल मीडिया आणि फोनद्वारे प्रितम म्हात्रे यांच्याशी संपर्क करून नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# राजमाता जिजाऊसाहेब भोसले व स्वामी विवेकानंद जयंती

## कर्जत नगरपरिषदेच्या वतीने अभिवादन



**दै.रायगड नगरी । कर्जत**

राजमाता जिजाऊसाहेब भोसले व स्वामी विवेकानंद यांची आज जयंती, कर्जत नगरपरिषदेच्यावतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.

राजमाता जिजाऊसाहेब भोसले व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी नगरसेविका वैशाली मोरे, नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी उमेश राऊत, रविंद्र लाड, कल्याणी लोखंडे, रुषिता शिंदे, हरिश्चंद्र वाघमारे, बापू बहिराम आदी उपस्थित होते.

# भाजप ओबीसी मोर्चाच्यावतीने पनवेलमध्ये 'मानव साखळी आंदोलन'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंजाब येथे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेत केलेली त्रुटीपूर्ण कुचराई व कट कारस्थान रचून केलेल्या चुकीमुळे पंजाबमधील कॉंग्रेस सरकारने निकृष्ट मानसिकतेचे प्रदर्शनातून, हेतुपुरस्सरपणे घडवलेल्या घटनेचा निषेध म्हणून भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या वतीने आज (बुधवार दि.१२ जानेवारी) पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाबाहेर मानव साखळी आंदोलन करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, सभागृहनेते परेश ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड.मनोज भुजबळ, ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, ओबीसी मोर्चा उत्तर रायगड महिला जिल्हाध्यक्षा तथा उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, ओबीसी मोर्चा पनवेल मंडल महिला अध्यक्षा नगरसेविका वृषाली वाघमारे, राकेश भुजबळ, अजित लोंढे, नितीन भुजबळ, किशोर शिंदे, प्रभाग समिती 'ब' सभापती प्रमिला पाटील यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने मानव साखळी आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी साखळी आंदोलनादरम्यान ओबीसी मोर्चाच्या वतीने पंजाब कॉंग्रेस सरकारचा निषेध नोंदवून घोषणाबाजी करण्यात आली.




यावेळी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ यांनी बोलताना सांगितले की, पंजाबमध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दौऱ्यावर असताना पंजाब राज्य सरकारने हेतुपुरस्सर कट रचून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सुरक्षेबाबत कुचराई केल्याने आजचे साखळी आंदोलन हे पंजाब कॉंग्रेस सरकारच्या निषेधार्थ केलेले आहे. नरेंद्र मोदी यांनी देशाला जगात स्थान मिळवून दिले आहे. मोदी हे धनदांडग्याचे, उद्योगपतींचे नसून सर्वसामान्य नागरिकांचे नेते आहेत. मोदींनी केलेले कार्य कॉंगेसच्या नजरेत खुपत आहे, त्यामुळे मोदींची सत्ता घालवण्यासाठी ते कोणत्याही थराला जात आहेत.

मोदींच्या लोकप्रियतेमुळे त्यांना राजकीय दृष्ट्या संपवता येणे शक्य नसल्याने त्यांच्या जीवावर घाला घालण्याचा घृणास्पद प्रयत्न करण्यात आला. पंजाब कॉंग्रेस सरकारने मोदींना जीवे संपवण्याचा नियोजित कट रचला होता. या घटनेचा सर्व स्तरातून निषेध होत असल्याची प्रतिक्रिया अॅड.मनोज भुजबळ यांनी व्यक्त केली.

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर प्रशासना समवेत सकारात्मक चर्चा

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी प्रशासन भवन येथील प्रशिक्षण केंद्र येथे उरणचे माजी आमदार मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली जेएनपीटी येथ झालेल्या बैठकीमध्ये जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयातील गेले अडीच वर्षे प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली, पालक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे आंदोलन च्या अनुषंगाने दि. २४ डिसेंबर २०२१ रोजी जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांच्या समवेत माजी आमदार मनोहर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित शिष्टमंडळा बरोबर झालेल्या चर्चेअंती जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ, डेप्युटी चेअरमन, जेएनपीटी यांनी दिलेल्या सुचनेनुसार काल जेएनपीटीचे मुख्य प्रबंधक जयंत ढवळे प्रशासकीय अधिकारी श्री. मोरे तसेच आर. के.एफ.मॅनेजमेंटचे कायदेशीर सल्लागार यांच्या समवेत बैठक झाली.

पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सर्व मुद्यांवर सकारात्मक चर्चा होवून संस्थेच्या हस्तांतरणा बाबत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी पारीत केलेले शासन निर्णयानुसार या पूर्वी जसे आय ई एस संस्थेने शासकीय नियमानुसार वेतन निश्चिती करून ज्या प्रमाणे वेतन व इतर सर्व भत्ते देऊ केलेले आहेत त्या प्रमाणे वेळोवेळी वेतनश्रेणी मध्ये शासकीय नियमानुसार होणाऱ्या बदलासह पुर्वलक्षी प्रभावाने देण्याच्या अटीला अधिन राहून दिलेल्या सम्मती पत्राचे वाचन करुन हस्तांतरण करण्यास एक मताने आर. के. एफसह जेएनपीटीच्या अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली तसेच इतर सर्व विषय हस्तांतरण झाल्यावर प्राधान्याने करण्याचे मान्य केले.

या वेळी माजी आमदार मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक नेते नरसू पाटील, जेएनपीटीचे विश्वस्त कॉ. भूषण पाटील, विश्वस्त दिनेश पाटील, जि. प. सदस्य विजय भोईर, पं. स. सदस्य दिपक ठाकूर, उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार, कामगार नेते संदिप पाटील सुरेश पाटील, पालक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष किरण घरत, योगेश तांडेल तसेच मुख्याध्यापक रमाकांत गावंड, गिरीश पाटील, प्रमोद कांबळे ईतर शिक्षक उपस्थित होते.



# मनोज म्हसे मुख्याधिकारी पदाची परिक्षा उत्तीर्ण

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील वारे या गावात शेतकरी कुंटूबात जन्मलेला मनोज म्हसे मुख्याधिकारी पदाची परिक्षा उत्तीर्ण झाल्याने मनोज चे सर्वत्र कौतुक होत आहे.



मनोज ने प्राथमिक शिक्षण मुळ गावी म्हणजे वारे या एक खेडे गावात पुर्ण केले शिक्षणाची इच्छा असलेल्या मनोज ने जिद्दीच्या जोरावर बीएससी अग्रिकलचर पदवी घेतली. यानंतर मनोज ने कर्जत नगरपालिकेत २००४ साली कामावरून रूजू झाला शांत आणि मनमिळाऊ मनोज ने अल्पावधीतच नगरपालिकेत सर्वांना आपले केले २०१३ साली मनोज खोपोली येथे बदली झाली, त्यानंतर खालापुर, बदलापूर येथे बदली झाली उद्यान, प्रवेशक कर, निरीक्षक मालमत्ता व्यवस्थापक अशा विविध पदावर मनोज ने प्रामाणिक पणे काम केले.

परंतु या पुढे जाऊन आपण काही तरी करून दाखवावे अशी इच्छा मनोज च्या मनात होती, त्यातच अलिकडेच शासनाने दहा टक्के पदांसाठी परिक्षा घेऊन पदोन्नती परिक्षा घेऊन नगरपालिका, नगरपंचायत कर्मचारी तसेच अधिकारी यांना पनोदीद्वारे मुख्याधिकारी म्हणून काम करण्याची संधी देण्याचे ठरवले या संधी चे सोने करण्याचे मनोज ने ठरवले सुरुवाती पासून जिद्दी असेल्या मनोज ने संचालक तथा आयुक्त नगपालिका प्रशासन मुंबई यांनी विभागीय परिक्षा घेतलेल्या परिक्षेत घवघवीत यक्ष संपादन करून त्यात मनोज ने ९ क्रमांक पटकावून उत्तीर्ण झाला.

मनोज आत लकरच मुख्याधिकारी पदी विराजमान होणार आहे, माणसाकडे जिद्द, चिकाटी असेल तर माणूस काहीही करू शकतो हे मनोज ने दाखवून दिले. मुख्याधिकारी झालेल्या मनोज च सर्व मित्र मंडळी तसेच नागरिकांकडून अभिनंदन होत आहे, या पुढे देखील लोकांना चांगली सेवा देणार असल्याचे या नवीन झालेल्या मुख्याधिकारी यांनी सांगितले.

# थंडीच्या कडाक्यात सामान्य रूग्णांची संख्या वाढू लागली

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

गेल्या दोन तीन दिवसांपासून वातावरणाचा पारा खाली घसरल्याने थंडीचा कडाकाही वाढू लागल्याने परिणामी सामान्य रूग्णांची संख्याही वाढू लागली असल्याचे दिसून येत आहे.

थंडीचा मोसम आणि सर्दी,खोकळा व ताप यांचा जवळचा संबंध आहे. तर दिवसेंदिवस थंडी वाढू लागल्याने या सामान्य आजाराचे रूग्णही वाढू लागल्याने दवाखान्यातही रूग्णांची संख्या वाढू लागली आहे.पहाटे पडणारे दाट धुके सकाळचे अकरा वाजले तरी हटत नसल्याने वातावरणातील कमाल गारवा हा टिकून राहत आहे. परिणामी वातावरणातील गारवा टिकून राहत असल्याने सकाळी अकरा वाजले तरी कमालीची बोचरी थंडी जाणवत आहे. याशिवाय संध्याकाळी पाच पासूनच थंडी जाणवायला सुरूवात होते. थंडीच्या वाढत्या प्रादूर्भावामुळे सर्वांनाच थंडीचा सामना करावा लागत आहे.थंडीच्या त्रासामुळे सर्दी, खोकळा व ताप रूग्णही वाढू लागल्याने छोट्या मोठ्या दवाखान्यात रूग्णांची संख्याही वाढू लागली आहे.चार दिवसांपूर्वी कोसळलेल्या अवकळी पावसामुळे वातावरणातील हा गारवा वाढला असल्याचे जुन्या जाणत्या मंडळीचे म्हणणे आहे.तर थंडीच्या दिवसात प्रत्येकाने आपापल्या आरोग्याची योग्य ती काळजी घेऊन आपले आरोग्य निकोप कसे राहिल याकडे लक्ष देण्याची सूचना तज्ञ डॉक्टर रूग्णांना देत आहेत.

# टँकरमधील अमोनियाची गळती; अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी रवाना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील टि पॉईंट येथे झालेल्या अपघातात एक टँकर पलटी झाल्याने त्यातून अमोनियाची गळती सुरू झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोचल्याने त्यांनी हि गळती अटोक्यात आणली आहे. पनवेल जवळून जाणाऱ्या जेएनपीटी मार्गावरील कळंबोली टि पॉईंट येथे आज सकाळी कंटेनर व अमोनिया टँकरची समोरासमोर धडक झाली. या धडकेत अमोनिया असलेला टँकर पलटी झाला व त्यात असलेला वायू बाहेर निघू लागला. या घटनेची माहिती मिळताच अग्निशन दलाचे बंब, वाहतूक शाखेचे अधिकारी घटनास्थळी पोचून त्यांनी हि वायू गळती रोखली आहे.


कु.प्रतिक (पंकज) रत्नाकर भोसले



यास वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक : भोसले, जाधव परिवार व मित्र परिवार